# यावल महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेबाबत आयोजन सभा संपन्न

यावल (प्रतिनिधी) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल येथे प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली.

आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेच्या सभेत विविध समिती स्थापन करण्यात आल्या व प्रत्येक समिती अंतर्गत येणाऱ्या कामाची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार यांनी केले.

सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा संजय पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.



